# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

## निवडणूक अधिसूचना

**विषय:** सत्र २०२४-२५ “करिअर संसद” गठन

### १. प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या “करिअर कट्टा” या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये करिअर संसदेची स्थापना केली जाते. करिअर संसदेची स्थापना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या संसदेच्या माध्यमातून विद्यार्थी नेतृत्व कौशल्ये, संघटनात्मक क्षमतांचे विकास, आणि निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळवतात. करिअर संसद विद्यार्थी स्वायत्तता, उत्तम संवाद कौशल्ये, आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा विकास करते. या संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या दिशेने एक सशक्त पायाभरणी घडवता येते, ज्यामुळे ते भावी आव्हानांना समर्थपणे तोंड देऊ शकतील. तसेच, या संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकत्र येऊन सहकार्याने काम करण्याची आणि त्यांच्या समस्या, संधी आणि आव्हाने सामूहिक पद्धतीने सोडवण्याची संधी मिळते. अशा प्रकारे करिअर संसद विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याची उभारणी करण्यासाठी आणि त्यांच्यातील नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून देते.

महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात पार पडणाऱ्या “शिवसंसदेत” करिअर संसदेचे प्रतिनिधी मंडळ सहभागी होऊन विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करेल.

### २. निवडणूक घोषणा:

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे सत्र २०२४-२५ च्या करिअर संसदेच्या गठणासाठी निवडणुकीची घोषणा करण्यात येत आहे. महाविद्यालयातील बी.एस्सी., बी.व्होक., आणि बी.सी.ए. वर्गांचे सत्र २०२४-२५ मधील सर्व प्रवेशित विद्यार्थी या निवडणुकीत मतदान करतील आणि आपल्या प्रतिनिधींची निवड करतील. निवडणुकीद्वारे निवडून आलेले प्रतिनिधी करिअर संसदेच्या मंत्रिमंडळाचे गठन करतील आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत राहतील.

या सार्वत्रिक महाविद्यालयीन निवडणुकीच्या माध्यमातून करिअर संसदेच्या गठणाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या सहभाग प्रक्रियेत घ्यावा आणि आपल्या उज्ज्वल भविष्याच्या निर्मितीसाठी योगदान द्यावे.

३. **करिअर संसदः**

क. महाविद्यालयातील प्रत्येक पदवी वर्गांचे सत्र २०२४-२०२५ शैक्षणिक सत्रात प्रवेशीत विद्यार्थी या निवडणुकीत मतदार म्हणून भुमिका बजावतील व आपल्या वर्गाचे प्रतिनिधी निवडतील.

ख. बिएस्सी, बिव्होक आणि बिसीए भाग १, २, आणि ३ चे विद्यार्थी त्यांचे दोन प्रतिनिधी (एक पुरुष + एक महिला) करिअर संसद सदस्य निवडून देतील.

ग. करिअर संसदेचे निवडून आलेले सदस्य अंतर्गत निवडणुकीद्वारे मंत्रिमंडळाचे गठन करतील.

घ. करिअर संसदेच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्री, नियोजन मंत्री , कायदे व शिस्त पालन मंत्री, सामान्य प्रशासन मंत्री, माहिती व प्रसारण मंत्री, उद्योजकता विकास, रोजगार स्वयंरोजगार मंत्री , कौशल्य विकास मंत्री, संसदीय कामकाज मंत्री यांचा समावेश असेल तर इतर निवडून आले विद्यार्थी संसद सदस्य म्हणून कार्य करतील.

ङ. निवडणूकीद्वारे सदस्य निवडण्यासाठी वर्ग, प्रतिनिधी संख्या आणि मतदार -

| अ.क्र. | वर्ग | प्रतिनिधी संख्या | | मतदार |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | |
| १. | बिएस्सी भाग १ (B) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| २. | बिएस्सी भाग १ (MEB) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ३. | बिएस्सी भाग १ (CS) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ४. | बिएस्सी भाग १ (M) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ५. | बिएस्सी भाग २ (B) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ६. | बिएस्सी भाग २ (MEB) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ७. | बिएस्सी भाग २ (CS) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ८. | बिएस्सी भाग २ (M) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ९. | बिएस्सी भाग ३ (B) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १०. | बिएस्सी भाग ३ (MEB) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| ११. | बिएस्सी भाग ३ (CS) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १२. | बिएस्सी भाग ३ (M) | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १३. | बिव्होक भाग १ | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १४. | बिव्होक भाग २ | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १५. | बिव्होक भाग ३ | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १६. | बिसीए भाग २ | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| १७. | बिसीए भाग ३ | १ | १ | या वर्गात सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| | **एकूण प्रतिनिधी संख्या** | **१७** | **१७** | |

## ४. निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या जबाबदारी:

क. करिअर संसदेचे निवडून आलेले प्रतिनिधी हे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाची धुरा सांभाळणारे प्रमुख घटक असतील. त्यांच्या जबाबदाऱ्या विविध आणि महत्त्वपूर्ण असतील. ते विद्यार्थ्यांच्या समस्या, तक्रारी, आणि सूचना व्यवस्थापनाला प्राधान्य देतील आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास मदत करतील. प्रत्येक प्रतिनिधीला आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी असेल, तसेच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आणि भावनिक गरजांची पूर्तता करण्यासाठी कार्य करावे लागेल.

ख. मंत्रिमंडळातील विविध मंत्री त्यांच्या पदांनुसार नियोजन, कायदे व शिस्त पालन, सामान्य प्रशासन, माहिती व प्रसारण, उद्योजकता विकास, रोजगार स्वयंरोजगार, कौशल्य विकास, आणि संसदीय कामकाज या क्षेत्रांमध्ये नेतृत्व प्रदान करतील.

ग. प्रतिनिधींनी महाविद्यालयातील विविध कार्यक्रम, कार्यशाळा, आणि उपक्रमांचे आयोजन करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागाची खात्री करणे अपेक्षित आहे. त्यांनी महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांमधील दुवा म्हणून कार्य करावे आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आपली भूमिका निभवावी. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे विद्यार्थ्यांचे कल्याण आणि महाविद्यालयाच्या विकासात सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता असेल.

## ५. करिअर संसद सदस्य पदाची निवडणूक लढण्यासाठी पात्रता:

क. उमेदवार सत्र २०२४-२५ मध्ये महाविद्यालयात प्रवेशित असावा.

ख. उमेदवाराची महाविद्यालयातील उपस्थिती ७० % हून अधिक असावी. अश्या स्वरूपाचे प्रतिज्ञापत्र विद्यार्थी देतील.

ग. उमेदवार करिअर कट्टा उपक्रमात नोंदणीकृत असावा. (विद्यार्थ्यांची करिअर कट्टा नोंदणी ३ वर्षांसाठी असते. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांना उमेदवारी दाखल करायची आहे त्यांना मुदतीआधी नोंदणी करणे आवश्यक आहे).

## ६. निवडणूक प्रक्रिया:

**पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात सदर निवडणुक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.**

**क. करिअर संसद सदस्य निवडणुक:**

महाविद्यालयात सत्र २०२४ – २०२५ मध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी (बी.एस्सी, बी.सी.ए. आणि बी.व्होक) प्रवेशीत भाग १, २ आणि ३ चे प्रत्येक वर्गातील (BIO, MEB, PCM & CS) विद्यार्थी त्यांचे दोन प्रतिनिधी (एक विद्यार्थी आणि एक विद्यार्थिनी) करिअर संसद सदस्य पदी निवडून देतील.

हे प्रतिनिधी करिअर कट्टाचे नोंदणीकृत विद्यार्थी असणे आवश्यक आहे. प्रत्येक वर्गातील प्रवेशित विद्यार्थी सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करून प्रतिनिधी निवडतील.

**ख. करिअर संसद म मंत्रिमंडळ गठन:**

करिअर संसदेत वर्गांचे निवडून आलेल्या सदस्यांमधून करिअर संसदेच्या मंत्रिमंडळाचे गठन करण्यासाठी अंतर्गत निवडणूक घेण्यात येईल. या निवडणुकीमधून मुख्यमंत्री पदासह विविध ८ मंत्री निवडण्यात येतील.

## ७. नामनिर्देशन प्रक्रिया:

करिअर संसद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी खालील प्रक्रिया अनुसरावी:

क. **अर्ज सादर करणे**:

a. नामनिर्देशन अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरण्यासाठी उपलब्ध असतील.
b. उमेदवारांनी पूर्ण भरलेल्या नामनिर्देशन अर्जाची प्रिंट काढून महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागात जमा करावे.
c. अर्जासोबत आवश्यक दस्तऐवजांचा एक समावेश करावा:
   i. ओळखपत्राची प्रत (महाविद्यालयाने जारी केलेले ID कार्ड किंवा प्रवेश शुल्क भरल्याची पावती)
   ii. ७०% हजेरीचे प्रमाणपत्र (आपणास शिकवीत असलेल्या कोणत्याही शिक्षकाचे प्रमाणपत्र)
   iii. करिअर कट्टा ओळखपत्र

ख. **अर्ज परत घेणे**:

a. अर्ज परत घेण्यासाठी, उमेदवारांनी प्रशासन विभागात लेखी अर्ज सादर करावा.

ग. **अर्ज तपासणी**:

a. निवडणूक विभाग उमेदवारी अर्जांची तपासणी करून योग्यतेच्या निकषांची पडताळणी करेल.
b. अपूर्ण किंवा अयोग्य अर्ज फेटाळण्यात येतील आणि त्याबाबत उमेदवारांना लेखी सूचित केले जाईल.

घ. **अंतिम उमेदवार यादी**:

a. निवडणुकीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी महाविद्यालयाच्या नोटिस बोर्डावर आणि अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल.

ङ. **प्रचार कालावधी**:

a. निवडणुकीतील सर्व उमेदवारांसाठी एक बैठक आयोजित केली जाईल ज्यामध्ये निवडणूक प्रक्रिया, आचारसंहिता, आणि प्रचार नियम स्पष्ट केले जातील.

b. प्रचारासाठी प्रत्येक उमेदवाराने एक स्वत:चा आपले मत, उद्दिष्ट्य, व्हिजन आणि मिशन सांगणारा आवाहन करणारा व्हिडीओ तयार करावा व निवडणूक विभागात सादर करावा. हा व्हिडीओ संबंधित वर्गाच्या ग्रुपवर विद्यार्थ्यांसाठी पाठविण्यात येईल.

c. प्रचार करताना महाविद्यालयाच्या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य आहे. कुठल्याही वर्गात अथवा महाविद्यालयात विद्यार्थी प्रचार साहित्याचे वितरण प्रदर्शन करणार नाहीत.

## ८. ऑनलाईन निवडणूक प्रक्रिया:

करिअर संसद निवडणुकीची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने गुगल फॉर्मच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी कृपया खालील सूचना वाचून लक्षपूर्वक पालन कराव्या.

क. **ई-मेल आयडीची आवश्यकता:** निवडणूक प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या नियमित आणि प्रवेश प्रक्रियेत नमूद केलेल्या ई-मेल आयडीचाच वापर करावा. या ई-मेल आयडीचा वापर निवडणूक संबंधित सर्व माहिती आणि मतदान प्रक्रियेसाठी होणार आहे.

ख. **ई-मेल आयडी सत्यापन:** विद्यार्थ्यांनी त्यांचा ई-मेल आयडी तपासून खात्री करावी की तो नियमित वापरात आहे आणि त्यावर निवडणूक संबंधित सूचना प्राप्त होऊ शकतील.

ग. **गुगल फॉर्मद्वारे मतदान:** मतदान करण्यासाठी महाविद्यालयाच्या अधिकृत गुगल फॉर्मचा वापर करण्यात येईल.

घ. **मतदान:** मतदानाचे दिवशी नियोजित वर्गखोलीत आपणास वेळेवर पुरविण्यात येणाऱ्या लिंकद्वारा आपल्या व्यक्तिगत नियमित आणि प्रवेश प्रक्रियेत नमूद केलेल्या ई-मेल चा वापर करून मतदान करायचे आहे.

ङ. विद्यार्थ्यांना निर्धारित कालावधीतच मतदान करावे लागणार आहे. त्याकरिता वेळोवेळी जाहीर केल्या जाणाऱ्या सूचनाची नोंद घ्यावी.

च. मतदान प्रक्रियेत विद्यार्थ्यांना फॉर्ममध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

छ. एकदा मतदान झाल्यानंतर ते अंतिम मानले जाईल आणि कोणतेही बदल करता येणार नाहीत.

ज. **गोपनीयता:** विद्यार्थ्यांचे मतदान गोपनीय ठेवले जाईल. मतदानाची प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष राहील याची दक्षता प्रत्येक मतदाराने आणि उमेदवाराने घेणे अनिवार्य आहे.

**करिअर संसद निवडणूक वेळापत्रक**

| अनु क्रमांक | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1. | अधिसूचनेची तारीख | २७ जुलै २०२४ |
| 2. | विद्यार्थ्यांमधून इच्छुकांची नावे/ अर्ज मागवणे | ३ ऑगस्ट २०२४ |
| 3. | प्राप्त अर्जांची छानणी | ४ ऑगस्ट २०२४ |
| 4. | अर्ज मागे घेण्यासाठी शेवटची संधी | ५ ऑगस्ट २०२४ |
| 5. | वैध अर्ज जाहिर करणे | ५ ऑगस्ट २०२४ |
| 6. | **करिअर कट्टा संसद सदस्य निवडणुक** प्रक्रिया पूर्ण करणे | ६ ऑगस्ट २०२४ |
| ६ | **करिअर संसद गठण निवडणुक** प्रक्रिया पूर्ण करणे | ८ ऑगस्ट २०२४ |
| ७ | नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देवून शपथविधी | १२ ऑगस्ट २०२४ |

करिअर संसद निवडणुकीत विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. महाविद्यालयाच्या या अनोख्या उपक्रमात सहभागी होऊन आपले नेतृत्व कौशल्य, संघटनात्मक क्षमता आणि सामाजिक जबाबदारी या गुणांचा विकास करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. आपण सर्वांनी निवडणूक प्रक्रियेत उत्साहाने सहभागी व्हावे आणि आपले मतदानाचे अधिकार पारदर्शकपणे आणि जबाबदारीने पार पाडावे.

आपल्या सहभागामुळेच करिअर संसद एक यशस्वी उपक्रम ठरेल आणि आपल्या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी एक मजबूत पायाभरणी निर्माण होईल. या निवडणुकीसाठी आपण आपले नियमित ई-मेल आयडी वापरून ऑनलाईन मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे.

सर्व विद्यार्थ्यांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन आपले हक्क बजावावेत, सर्वांना महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांच्या हार्दिक शुभेच्छा!

**अमरावती**
**दि.** २६ जुलै २०२४

**डॉ रेखा मग्गीरवार**
महाविद्यालय समन्वयक
करिअर कट्टा

**डॉ जी व्ही कोरपे**
प्राचार्य
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

करिअर संसद गठन सत्र: २०२४-२५

**करिअर कट्टा समिती**

महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून खालील समितीचे गठन करण्यात येते आहे -

| **अ.क्र.** | **प्राध्यापक** | **जबाबदारी** |
|---|---|---|
| 1. | डॉ रेखा मग्गीरवार | समन्वयक |
| 2. | डॉ अनुराधा राजोरीया | सदस्य सचिव |
| 3. | डॉ प्रशांत मंडलिक | सदस्य |
| 4. | डॉ दिनेश खेडकर | सदस्य |
| 5. | डॉ नितीन बनसोड | सदस्य |
| 6. | डॉ मनीष गायकवाड | सदस्य |
| 7. | डॉ मयुरा देशमुख | सदस्य |
| 8. | डॉ विक्रांत बुटे | सदस्य |
| 9. | डॉ वैशाली देशमुख | सदस्य |
| 10. | डॉ उज्ज्वला जुनघरे | सदस्य |
| 11. | डॉ श्रुती इंगोले | सदस्य |
| 12. | डॉ कविता वाटाणे | सदस्य |
| 13. | डॉ सुवर्णा मानकर | सदस्य |

उपरोक्त सर्व सदस्यांनी समन्वयकांशी संपर्क करून तातडीने करिअर संसद गठन प्रक्रियेचे नियोजन करावे.

**अमरावती**
**दि.** २६ जुलै २०२४

**डॉ जी व्ही कोरपे**
प्राचार्य
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

**प्रत:** डॉ रेखा मग्गीरवार, समन्वयक तसेच सर्व सदस्य.

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

करिअर संसद गठन सत्र: २०२४-२५

**नामनिर्देशन अर्ज**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१** | **उमेदवाराचे पूर्ण नाव** | आडनाव | प्रथम नाव | वडिलांचे नाव |
| **२** | **वर्ग** | बी.एस्सी ☐<br>बी.सी.ए. ☐<br>बी.व्होक. ☐ | भाग १ ☐<br>भाग २ ☐<br>भाग ३ ☐ | B ☐<br>MEB ☐<br>CS ☐<br>M ☐ |
| **३** | **महाविद्यालय आय डी क्र.** | | | |
| **४** | **मोबाइल संपर्क क्रमांक** | | | |
| **५** | **ई-मेल** | | | |
| **६.** | **आवश्यक दस्तऐवजांची यादी:** | ☐ - ओळखपत्र / प्रवेशशुल्क पावतीची प्रत<br>☐ - ७०% हजेरीचे प्रमाणपत्र<br>☐ - करिअर कट्टा ओळखपत्र | | |

**सूचक विद्यार्थ्याचे नाव व सही** | **अनुमोदक विद्यार्थ्याचे नाव व सही**

_______________________________ | _______________________________

(सूचक / अनुमोदक विद्यार्थी उमेदवाराच्या वर्गातील प्रवेशित विद्यार्थी असणे आवश्यक आहे)

---

**प्रतिज्ञापत्र**

मी, ____________________________________________________, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे सत्र २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थी आहे. माझी महाविद्यालयातील उपस्थिती ७०% हून अधिक आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आणि त्यानंतर महाविद्यालयाच्या सर्व आचारसंहिता आणि नियमांचे पालन करेन. मी करिअर कट्टा उपक्रमात नोंदणीकृत विद्यार्थी आहे आणि या उपक्रमाच्या सर्व नियमांचे पालन करेन. निवडून आल्यास, मी माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांचे योग्यरित्या प्रतिनिधित्व करेन आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करेन. करिअर संसदेच्या सदस्य म्हणून माझ्या सर्व कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करेन. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता ठेवेन. मी या प्रतिज्ञापत्रातील सर्व गोष्टी सत्य आणि प्रामाणिकपणे स्वीकारत आहे.

(उमेदवाराची सही)

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

करिअर संसद गठन सत्र: २०२४-२५

**७०% हजेरीचे प्रमाणपत्र**

विद्यार्थ्याचे नाव: ____________________________________________________________

वर्ग आणि विभाग: ____________________________________________________________

प्रमाणित करण्यात येते की,

सदर विद्यार्थी / विद्यार्थिनी महाविद्यालयाच्या सत्र २०२४-२५ मध्ये नियमित विद्यार्थी आहे. या विद्यार्थी / विद्यार्थिनीची __________________________ या विषयातील वर्गाची हजेरी ७०% हून अधिक आहे.

७०% हजेरीचे प्रमाणपत्र मागविल्याने मी, ______________________________________[शिक्षकाचे नाव], त्याच्या/तिच्या हजेरीच्या तपशिलांची पडताळणी केली आहे आणि हे प्रमाणपत्र देत आहे.

तारीख: ___________

ठिकाण: ___________

शिक्षकाची सही

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

करिअर संसद गठन सत्र: २०२४-२५

**नामनिर्देशन परत घेण्यासाठी अर्ज**

**प्रति,**
मा. प्राचार्य,
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,
अमरावती.

**विषय: करिअर संसद निवडणुकीसाठी सादर केलेला उमेदवारी अर्ज परत घेणे बाबत**

मा. महोदय,

मी, ______________________________________________, वर्ग: ____________विभाग___________,
या महाविद्यालयातील नियमित विद्यार्थी आहे. मी करिअर संसद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर केला होता. मात्र, काही वैयक्तिक कारणांमुळे मला माझा उमेदवारी अर्ज परत घ्यायचा आहे. कृपया माझा उमेदवारी अर्ज परत घेण्याची परवानगी द्यावी.

माझा उमेदवारी अर्ज परत घेण्याची कृपा करून नोंद घ्यावी.

धन्यवाद!

आपला विश्वासू,

अमरावती.
दि. __________

(उमेदवाराचे पूर्ण नाव व सही)

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

**NAAC:** A+ Grade; **UGC:** CPE, **NIRF(2021 & 2022):** Rankband 151-200
**ISO:** 9001-2015; **DST:** FIST; **SGBAU:** Lead College, **Career Katta:** Centre of Excellence

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांचे संयुक्त अभियान

# करिअर कट्टा: करिअर संसद २०२३


श्री. सर्वेश जडे
मुख्यमंत्री


श्री. निखील डोंगरदिवे
नियोजन मंत्री


कु. रुची तानोड
कायदे व शिस्त पालन मंत्री


कु. सुहानी पवार
सामान्य प्रशासन मंत्री


श्री पार्थ गुबरे
माहिती व प्रसारण मंत्री


कु. साक्षी बोरकर
उद्योजकता विकास मंत्री


कु. स्नेहल तायडे
स्वयंरोजगार मंत्री


कु. हुमांशी गभने
कौशल्य विकास मंत्री


कु. ममता सुणे
संसदीय कामकाज मंत्री


श्री योगेश जाधव
कार्यकारी सदस्य


कु. नेहा रंदे
कार्यकारी सदस्य


श्री. असद खान
कार्यकारी सदस्य


श्री. आनंद डवाले
कार्यकारी सदस्य


श्री प्रथमेश सावळे
कार्यकारी सदस्य


कु. वैष्णवी धोलवाडे
कार्यकारी सदस्य


कु. मृणाल लाहे
कार्यकारी सदस्य


श्री. अंकित दहीकर
कार्यकारी सदस्य


कु. पायल हरदो
कार्यकारी सदस्य


डॉ. रेखा मग्गीरवार
प्रभारी प्राध्यापक


डॉ. वैशाली देशमुख
प्रभारी प्राध्यापक

## सर्व कार्यकारिणी सदस्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा!!